# पंचामृत

# पंचामृत

आर वाय देशपांडे

Savitri Foundation

First Edition
15 August 2025

Published by
**Savitri Foundation**
875, Sector 17B,
Gurugram, Haryana – 122001
Ph: +91124-4280241
E-Mail: info@savitri.in
Website: http://www.savitri.in

# पंचामृत
## A nectar of the gods

**पंचामृत – दूध-दही-तूप-साखर-मध**



पंचामृत दूध, दही, तूप, साखर आणि मध या पाच घटकांचे मिश्रण आहे. देवांना अर्पण करण्यासाठी आणि धार्मिक विधींमध्ये ह्याचा वापर होतो. हे घेतल्याने शरीरातील ७ धातू वाढतात आणि शरीर बळकट होते. **दूध** – शुद्धता आणि पवित्रता; **दही** – समृद्धीचे प्रतीक; **तूप** – शक्ती आणि विजय; **मध** – समर्पण आणि एकाग्रता; **साखर** – आनंद आणि गोडवा. पंचामृतस्नान ही एक देवपूजेतील क्रिया मानली गेली आहे. पूजा झाल्यानंतर देवतेचे तीर्थ म्हणून पंचामृत सेवन

करण्याची पद्धती आहे. गर्भवती स्त्रीने तिच्या आणि गर्भाच्या उत्तम वाढीसाठी दररोज पंचामृत प्यावे असे ज्योतीसतत्त्व या ग्रंथात सांगितले आहे.

इथे आपण काव्यातील थोडीशी विविधता आणि गोडवा रसाळतेने आस्वादन्याचा प्रयत्न करीत आहोत.

https://www.youtube.com/watch?v=ESEilViErNE

# थोडेसे आधीचे

काही महिन्यापूर्वी अचानक सुरवात झाली मराठीतून लिहिण्याची ह्या दोन ओळीपासूनः

देव आला देवाच्या घरी
उभारली नवी पंढरी।

बरेच दिवस त्या मनात सारख्या रेंगाळत राहिल्या. पण पुढे काही होत नव्हते. नंतर मात्र त्यांना घेऊन एकदम पहिली कविता साकारली गेली, एका झटक्यात. हे घडले २६ जानेवारी २०२५ला. आणि चमत्कार असा की, तेंव्हापासून मराठीतून काव्यलेखनास वेगाने जोर येऊ लागला. त्यापूर्वी मराठीतून काही म्हणजे काहीही लिहिले नव्हते. सर्व लिखाण इंग्रजीतून, अगदी सहजपणे. आधी विचार यायचे त्या भाषेत त्यामुळे हे नुसते मराठीकारण तर नव्हे ना असेही वाटू लागले. तरी देखील त्यातला मराठीचाच भाव अमूल्य आणि नाविन्यपूर्ण असल्याचे उमजू लागले. चार चौघा जाणत्यांना त्या पाठविल्या आणि प्रोत्साहक प्रतिसाद मिळाला. त्या धडाक्यात. २६ जानेवारी २०२५ ते ३ एप्रिल २०२५च्या काळात पंचवीसचा आकडा आला. वाटले हा छोटासा प्रयोग प्रसिद्ध करून तो कुठपर्यंत स्वीकाराह्य आहे ते पहावे. तसा मसुदाही तयार झाला, *आनंदाचा सोहळा* ह्या शीर्षकाखाली. इथे तो “दूध” ह्या सदरामधे आलेला आहे. सगळी भूमिका त्यात आहेच.

पण जेंव्हा छापायच्या दृष्टीने पुढे जायचे ठरविले तेंव्हा न संपणारा ओघ तसे करण्यास जाऊ देईना. सगळेच बदलले. ह्यात खूप दिवसापूर्वी इंग्रजी-संस्कृत रचनांचीही भर पडली. सर्व ठिकाणी अंतर्भाव आहे तो शेवटच्या *अद्भुत खार* ह्या कवितेतला :

शोधत उद्याचे रहस्य आली ह्या फांदीवर,
काय दिसे, सोनेरी प्रकाश अंधाऱ्या जगात;
तर जागृत आत्मा तिचा पाहे येणारे विश्व,
बघा, त्याच्या सन्मानार्थ कशी झाली उत्सुक;
आनंदाच्या पेरणीतून फोफावे आनंद आनंद,
आनंदाचे शेत, त्याचे सिंचन करी आनंदच.

१० जुलै २०२५

तुकारामाच्या "आनंदाचे डोही"त जेव्हढी उत्स्फुर्तता आहे, जेवढी सहजता आहे, जेवढा सरळपणा आहे तेवढा ह्या आनंदाच्या पेरणीत निश्चितच नाही; हिच्यात एक प्रकारचे वेगळे आधुनिकत्व आहे, वेगळा वैचारिक तसेच गूढत्वाचा भाव आहे. आजकालच्या मराठी काव्यात तो आढळत नाही असे म्हटले तरी ते अवावगे ठरणार नाही.

बाह्यरूपाकडून आपल्याला अंतःप्रज्ञेकडे-कल्पनाशीलतेकडे जाऊन नवे शोध प्रयोगशील करावयास हवे, अमलात आणावयास हवे. अतिवास्तविक काव्य, कल्पनावादी-प्रतिकात्मक काव्य, त्याच्याच शोधात आहेत. परंतु ते चेतनेच्या-सर्वज्ञतेच्या शांततेतून उद्भवणाऱ्या जाणीवेच्या सर्वोच्च पातळीतून आले पाहिजे. उच्च धारणा, उच्च सूर, उच्च मधुर लय, उच्च कल्पना, अभिजातपणा, श्रेष्ठता, हे सर्व भविष्यकालीन काव्य भविष्याचा आविष्कार करणारे ठरले पाहिजेत.

ह्या सद्य संकलनाची ओढ तिकडची आहे. त्यात कुठपर्यंत काही साधले गेले हेही तेव्हडे महत्वाचे ठरत नाही, ओढ महत्वाची, प्रयास मोलाचा. पण हा एक प्रयत्न म्हणून बघण्यास काहीच हरकत नसावी. जर तो क्षण आला असेल तर त्याचे स्वागत करून कार्यशील होण्याची तयारी असणे ह्यातच सर्व समर्थन आलेले आहे. गूढ आणि आंतरमानसिक प्रेरणा प्रबळ होऊन नवी दालने उघडतील ह्यात अजिबात शंका नाही. ती उघडली गेलीच पाहीजेत.

श्री अरविंदांच्या एका इंग्रजी कवितेचे उदाहरण येथे पाहणे योग्य ठरेल. तिचे शीर्षक आहे Rose of God, *ईश्वराचा गुलाब*, पाच कडव्यात. त्याचे शेवटचे कडवे असे :

Rose of God, like a blush of rapture on Eternity's face,
Rose of Love, ruby depth of all being, fire-passion of Grace!
Arise from the heart of the yearning that sobs in Nature's abyss:
Make earth the home of the Wonderful and life beatitude's kiss.

https://incarnateword.in/sabcl/5/rose-of-god
https://www.youtube.com/watch?v=--VHq9IZ25w&t=72s

हे ईश्वराच्या गुलाबा, तू अनंतकाळाच्या चेहऱ्यावर लालीसारखा हर्षच,
हे प्रेमाच्या गुलाबा, माणिक-खोली सर्व अस्तित्वाची, कृपेची अग्नि-उत्कटता!
उठ, तळमळीच्या हृदयातून उठ, देत आहे जी हुंदके निसर्गाच्या विवरात,
होऊ दे, कर, पृथ्वीला अद्भुताचे निलय, दे जीवनाला परमानंदाचे चुंबन.

गूढ आणि गहन कवितेत विशिष्ट प्रकारच्या दार्शनिक आणि आंतरीक भावना असतात, केवळ कल्पनाशक्ती किंवा विचार नसून गोष्टी सूचकपणाने प्रतिकात्मक भाषेत सांगितल्या जातात. त्यातून निरनिराळे पैलू, निरनिराळ्या अर्थछटा उद्भवून उजळतात. अनाकलनीय विषय हाताळून ती एका अद्वितीय प्रकारच्या प्रत्यय अथवा अनुभूती संवेदना घेऊन येते. त्यात तिचे यश आहे.

ह्यापंचामृत संग्रहातील भाव, त्याचा रस, त्याची चव, त्याचा स्वाद, सुगंध, त्याची शान, त्याचे आंतरध्वनी, त्याचे शांत सूक्ष्म आवाज ऐकून शांत वातावरणात त्यांचा आनंदोत्सव साजरा होईल अशीच अपेक्षा बाळगून तो आपणा चोखंदळांना सादर करीत आहे.

१५ जुलै २०२५

# विषय सूची

**दूध**
**आनंदाचा सोहळा**

प्रस्तावना ३
थोडीशी भूमिका ७
०१: देव आला देवाच्या घरी ११
०२: साखरखेड्याची गोष्ट १२
०३: येई शुभांगी १३
०४: दृढावे संकल्प प्रेमाचा १४
०५: गगनातला सूर्य अंगणात आला १५
०६: माझे पंख आले आकाशातून १६
०७: सावित्री प्रियतमाच्या शोधात १७
०८: अग्निशिखेचे आगमन १८
०९: जांभळा रंग गहिरा १९
१०: किरमिजी पंखाचा पक्षी २०
११: हवे ते इथलेच २१
१२: चांदण्याचे गुपित २२
१३: चंदनाचे झाड २३
१४: येई क्रियाशील श्रेष्ठा २४

१५: आनंदाचा सोहळा २५
१६: सुवर्ण ज्योत २६
१७: झोप होती माझी लांबलचक २७
१८: स्वर्ण प्रभा झळके ह्या भूमंडळी २८
१९: नांगरणीत सापडले अद्भुत भांडार २९
२०: प्रभु इच्छा – हाचि संकल्प ३०
२१: नवमानवाचे आगमन ३१
२२: मीच अनंताची गुपिते धारणारी सृष्टि ३२
२३: बारा मोत्याचा मुकुट ३३
२४: मी इथे का आलो? ३४
२५: सत्यवान – पृथ्वीचा आत्मा ३५

**दही**

**अद्भुताचा उत्सव**

०१: हे स्वप्न मला कळले ३६
०२: अनेकत्वाची धारणा ४१
०३: बकुळेची फुले ४३
०४: जांभळीच्या खाली ४५
०५: संकेताचा शब्द ४६
०६: टहाळाच्या जुड्या ४७
०७: वाढले माझे धन ४८
०८: पहाडगंज ४९
०९: अभिवेगाचा जन्म (विचाराचे मूळ – सावित्रीचा अनुभव) ५०
१०: चेटकिणीचे भवितव्य ५२

| | |
|---|---|
| ११: ही सौंदर्ययुवा उषा | ५४ |
| १२: वसंताच्या जल्लोशात | ५५ |
| १३: भविष्याचा महामार्ग | ५६ |
| १४: आणे संदेश पक्षी माझा | ५७ |
| १५: येई अग्निदेहपुत्र जन्मास | ५८ |
| १६: चौतन्याची तेजोमय उद्दिष्टे | ५९ |
| १७: जन्मास येई उज्वल | ६० |
| १८: सुपूर्दीकरण | ६१ |
| १९: उमगले माझेपण माझे मलाच | ६२ |
| २०: काळ्या देवदूताचे वक्तव्य | ६३ |
| २१: प्रशांतीची लयबद्ध रूपे | ६४ |
| २२: सगळे काही जाणणारे स्मित | ६५ |
| २३: अनाथ्यपण | ६६ |
| २४: अद्भुताचा उत्सव | ६७ |
| २५: ह्या प्रेमभरणीत एकच ध्यास | ६८ |
| २६: संसाराची ओढ | ७१ |
| २७: तिचा अविरत ध्यास | ७२ |
| २८: अग्निज्वाला घडवी तीव्र जीवन | ७३ |
| २९: मी आहे स्वामी राष्ट्रांचा | ७४ |
| ३०: गरुडाची दृष्टी | ७६ |
| ३१: गुणाकार मांडीला आणण्या सर्वांगी बहुत्व | ७७ |
| ३२: पहा, फुलबाग पक्षी आनंदाचे झरे | ७९ |
| ३३: देह-मन होई उज्वलित | ८० |

३४: अंधाराच्या गुहेत तेवत आहे दिवा ८२
३५: देहाची अर्चना धारण्या देवरूप ८४
३६: अतिवास्तवता ८५
३७: गजबजलेले माझे लहानसे गाव ८७
डवद चमजपज अपससंहम ८७
३८: धावत आहे जांभळे स्वप्न वाऱ्याच्या झोतात ८९
३९: मृत्यूच्या देहात वसे प्रकाश ९०
४०: अद्भुत खार ९१

**तूप**

**पळसाची पाने**

०१: तीन पक्षी ९५
०२: परिपूर्णता ९६
०३: हे कसे? ९७
०४: हल्ला ९८
०५: वाऱ्याची झुळूक ९९
०६: महानता १००
०७: गुपित १०१
०८: न लागे मौल्यवान ... १०२
०९: नाहीत ग्रंथालयात ग्रंथ १०३
१०: योजना नसे ती कुठे? १०४
११: पावित्र्य १०५
१२: सांगशिल का? १०६
१३: एक कठीण जिज्ञासा १०७
१४: निवडुंगाची फुले १०८

१५ः सतत पडत राहिला पाऊस १०६
१६ः वेगवान प्रगती ११०
१७ः देशपांड्यांचा वाडा १११
१८ः आरोहण ११२
१९ः ध्वनी विचारे ११३
२०ः चांदीचा चमचा ११४
२१ः पोहोचे संगीत धामा शांततेच्या ११५
२२ः ढग नाहीत पण ... ११६
२३ः आहे का खात्री? ११७
२४ः वाट पाहे पृथ्वी ११८
२५ः इथे लटकलेले शेपूट ११९
२६ः कोकिळेचे दुःख १२०
२७ः आडवे उभे धागे १२१
२८ः प्रभावी हाक १२२
२९ः छायेचे पर्यटन १२३
३०ः कशाचाही न होई नाश १२४
३१ः निर्देशांचा जन्म १२५
३२ः दिव्याविना रात्री उजेड १२६
३३ः मूल्य इहलोकीच्या जीवनाचे १२७
३४ः हे न्यारेच आध्यात्म १२८
३५ः एक विनवणी १२९
३६ः सदैव जागृत प्रेरणा १३०
३७ः वाट पाहतो हलकडीची १३१
३८ः मोगऱ्याचा गुच्छ १३२

३९: नक्षीदार झोपाळा १३३
४०: सर्वोत्तम प्रकाशाकडे १३४
४१: हेमलॉकचा कप १३५
४२: श्रेष्ठ पृथ्वी १३६
४३: महाभूतांचे आकलन १३७
४४: भाकीत १३८
४५: दिव्य जीवनाचा प्रारंभ १३९
४६: प्रकटीकरणासाठी १४०
४७: हे अतिथी १४१
४८: सात अग्नी १४२
४९: माधुर्याचा वर्षाव १४३
५०: अद्भुत वचन १४४

**साखर**

**तनूनपात**

**Tanūnapāta**

०१: शिशिरः तस्य हिमेन सह ...
01: Winter with its snow ... १४६

०२: अहं भवन्तं पूजयामि
02: I adore you १५२

०३: सुवर्णाकाशात् एकं नगरं अवतरति
03: A city is descending from the golden sky १५५

०४: भवन्तः आसनं गृहीतवन्तः
04: You have taken the seat १५८

०५: त्वं इच्छायाः ज्ञानस्य च
05: You of will and knowledge १६१

०६ः दिवा, रात्रौ
06: In day, in night १६४

०७ः अस्माकं मन्दं विलपन्तं मृत्युं आनयन्तु
07: Bring to our dim sobbing mortality १६७

०८ः भवतः सन्तानः प्रफुल्लितः भवतु
08: Let your offspring flourish १७०

०९ः एतत् उपरि-पुरुष चौतन्यम्
09: This surhomme consciousness १७३

१०ः मायां जातः माया
10: Magic born of magic १७६

११ः परदिनस्य स्वरेण सह ...
11: With voice of the morrow ... १७९

१२ः त्वं उत्सवस्य आश्चर्यस्य आनकः असि
12: You are the bringer of fêted marvel १८२

**मध**
**वयं तां पूजयामः**
We adore her

ॐ तस्यै ब्रह्मणः सृजिकायै नमः
Om thou the creatrix of Brahman १८७

यस्य वयं पूजयामः
The One whom we adore १९३

# दूध




१७ एप्रिल २०२५

# प्रस्तावना

* तरल आणि अंतर्वेधी कविता...*

योगी श्रीअरविंद यांच्या तत्त्वज्ञानाचे मर्मज्ञ अभ्यासक तसेच पॉडिचेरी येथील श्रीअरविंद आश्रमाचे ज्येष्ठ साधक आर. वाय. देशपांडे यांच्या 'आनंदाचा सोहळा' या कवितासंग्रहातील कविता वाचताना खरोखरीच आनंद वाटला. सर्वसाधारणपणे मानवी जीवनात सुख आणि दुःख या दोन भावनांमध्येच आनंद शोधाची प्रक्रिया साधली जाते; मात्र आनंद हा या दोन्ही भावनांच्या पलीकडे उभा असतो. ज्याला तो दिसतो तोच प्रतिभावंत त्याकडे धाव घेऊ शकतो. देशपांडे यांच्या प्रस्तुत संग्रहात ही त्यांची धाव स्पष्टपणे दिसते. संपूर्ण आयुष्य तत्त्वज्ञानाने मंडित असलेले देशपांडे मराठी कवितेसारखा ललित साहित्यप्रकार हाताळताना कुठेही अवजड होत नाहीत. त्या कवितेच्या शब्दांना पेलवतील, मानवतील अशाच आशयाने अवगुंठीत असणारे शब्द या कवितांच्या अंगोपांगी आहेत. एकूण पंचवीस कवितांचा हा संग्रह सृष्टी, मानवी जीवन, मानवेतर अवकाश यासंबंधी भाष्य करताना दिसतो.

योगी श्रीअरविंदांनीच असे म्हटले आहे की, "काव्याची साद ही आपल्या 'पलीकडून', वैयक्तिक बुद्धीच्या आटोक्याबाहेरील जगातून आलेली असते. ती आत्म्याचीच साद असते. कवी आत्मरूप होऊन त्याच्या दिव्य प्रकाशात आनंदमग्न अवस्थेत वस्तूंच्या मुळाशी जाऊन व्यापक सत्याचे दर्शन घेतो. त्याच्या काव्यभाषेतील शब्द क्रांतिकारक, झपाटून टाकणारा, अंतःस्फूर्त, प्रसादपूर्ण, सुक्ष्म-तरल, आनंदगर्भ व प्रकाशगर्भ रूप घेतो. या दृष्टीने 'मंत्रकाव्य म्हणजे अतिशय उत्कट व आशयगर्भ असा लयबद्ध शब्द होय'. भावी कवीची अंतिम भाषा मंत्र हीच राहाणार. आज माणूस बुद्धिवादाकडून अंतःप्रज्ञेकडे वळू लागला आहे; त्यामुळे युरोपमधील भावी काव्यही पूर्णपणे अंतःस्फूर्त होणार व त्यातून मानवी मनाची संवादपूर्ण व

प्रकाशगर्भ समग्रता व्यक्त होणार...” या श्रीअरविंदांच्या काव्याबद्दलच्या कथनाचा विचार करून जर आपण देशपांडे यांचा ‘आनंदाचा सोहळा’ हा संग्रह वाचायला गेलो तर अनेक गोष्टींचा उलगडा होतो.

स्वतः आर. वाय. देशपांडे हे गेली अनेक दशके पाँडिचरी येथे वास्तव्यास असून त्यांचा समग्र जीवनव्यवहार हा आता इंग्रजी भाषेत आहे. ते मूळचे मराठवाड्यातील आणि मराठी आहेत. त्यामुळे त्यांचे बालपण आणि पुढे पौगंडावस्था काळ संत साहित्य साधनेत व्यतीत झाला आहे. पुढे विज्ञान शाखेचे शिक्षण आणि उच्च संशोधन यांत ते एकरूप झाले. मराठी भाषेशी तसा संबंध राहिलेला नव्हता. तरीही प्रस्तुत संग्रहातील सगळ्या कविता या मराठी भाषेतच मूलतः अवतरल्या आहेत. असे होण्याचे कारण काय? असा सहज प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर महायोगी श्रीअरविंदांच्या वरील काव्यविषयक परिच्छेदाच्या वाचनातून सहज मिळते. “काव्य हे आत्म्याचेच सर्जन असते आणि ते आपल्या पलीकडून, वैयक्तिक बुद्धीच्या आटोक्याबाहेरील जगातून येते.” याचे प्रतिबिंब म्हणजेच ‘आनंदाचा सोहळा’ या संग्रहातील कविता होय.

संत तुकाराम महाराज एके ठिकाणी म्हणतात, “अंतरीचे धावे। स्वभावे बाहेरी। आवरिता परि। आवरेना ॥” या ओवीचा अर्थ अभ्यासकाला जाणून घेणे सहज शक्य असले, तरी या ओवीतील भाव समजून घ्यायचा असेल तर देशपांडे यांच्या कविता वाचल्या पाहिजेत. याचे कारण असे की, मनात अनेक वर्षे साचून असलेली भावना हळूहळू पक्व होत जाते आणि मग तिचे कलात्मक अवतरण घडते. देशपांडे यांच्या बाबतीत त्या कलात्मक अवतरणाचे नाव ‘कविता’ असे आहे. त्यामुळेच त्या वाचताना वाचकाच्या मनात अर्थ उतरत जातो असे म्हणण्यापेक्षा भाव उतरत जातो असे म्हणणे जास्त सयुक्तिक आहे.

सृष्टी आणि मनुष्य हे दोन वेगळे नाहीत. जे सृष्टीत आहे तेच मानवात आणि जे मानवात आहे तेच सृष्टीत. यालाच आपण ‘जे पिंडी ते ब्रह्मांडी’ असे म्हणतो. देशपांडे यांची कविता वाचत असताना याचा अन्वयार्थ उलगडतो. ‘येई शुभांगी’ या कवितेत ते म्हणतात,

*अणुरेणूत तीच प्रतिष्ठा, तोच थोरलेपणा*
*प्रफुल्लित जशी असे ही हसतमुख प्रेरणा*

*सप्तगंगेच्या काठी बसली महापंगत*
*आवडीचेच पक्वान्न सुगंधी केशरभात*

*दीप्तिवन्त वरुण, इंद्र, अग्नि सवितृ भग मित्र*
*प्रसन्नतेचा ध्वनी घुमे नवगायत्रीचा सर्वत्र*

वरील कवितेच्या ओळींमधून एक अतिशय समृद्ध आणि व्यापक आशय देशपांडे व्यक्त करतात. ही सृष्टी भव्य, दिव्य आणि उदात्त अशा तीन शब्दांनी व्यापलेली आहे. मानवी जीवनाची तिच्या या व्यापकतेशी सांगड घालताना कवीची अथवा लिहिणार्याची दमछाक होऊ शकते; पण देशपांडे मात्र हे संमीलन सहज घडवून आणतात. याचे कारण त्यांनी महायोगी श्रीअरविंदांचे तत्त्वज्ञान फक्त वाचून बुद्धीच्या कक्षेत बंद केलेले नाही तर ते प्रत्यक्षात जगून दाखवले आहे. माणूस जे जगतो त्याचेच बिंब त्याच्या कलात्मक आविष्कारामध्ये दिसत असते. हा युगानुयुगांचा सिद्धांत आहे. प्रस्तुत कवितेच्या बाबतीतही त्याचा ठायी ठायी प्रत्यय येतो.

२६ जानेवारी २०२५ ते ३ एप्रील २०२५ या अतिशय छोट्या कालावधीतील या कविता आहेत. त्यामुळे एखाद्या अज्ञात शक्तीने त्या सलगपणे त्यांच्याकडून लिहून घेतल्या आहेत की काय, असाही प्रश्न येथे पडतो. भारतीय साहित्यशास्त्रात काव्यविषयक विवेचन खुप विस्ताराने झालेले आहे. त्यामध्ये विशिष्ट कालावधीत झालेल्या रचनांना प्रज्ञा-प्रतिभा यांच्या तराजूत तोलताना विशिष्ट भावसंयोजनाची मीमांसा केलेली आढळते. त्याचा आनंद या समग्र कविता वाचताना वाचकाला मिळतो.

काळ बदलत गेला की त्यानुसार वास्तवाचे रूप-संदर्भही बदलत जातात. कधी ते कवितासारख्या कलात्मक घाटात येतात किंवा येतही नाहीत. प्रत्येक कवीची आणि त्याच्या कवितेची स्वतंत्र परिभाषा आणि भूमिका असते. तो त्या परिभाषा-भूमिकेशी जर प्रामाणिक राहिला, तर ती कविता अधिकाधिक तरल आणि अंतर्वेधी होत जाते. अशा मार्गावर आर. वाय. देशपांडे यांचा हा संग्रह जाताना दिसतो.

—स्वानंद बेदरकर
नाशिक (महाराष्ट्र)

(श्री. स्वानंद बेदरकर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, संपादक आणि वक्ते आहेत.)

# थोडीशी भूमिका

हे कसे घडले? सांगणे कठीण आहे. पण, नंतर घडले हे मात्र अगदी निश्चित. त्याचे मोठेपण वाढत गेले, वाढतच गेले. एके दिवशी सकाळी दोन ओळी अचानकच अवतरल्या. कोठून कशा आल्या याची थोडीही कल्पना नव्हती. ऑरोविल येथील मातृमंदिराची प्रतिमा मात्र डोळ्यासमोर सारखी उभी होती, स्वप्नातील नवी नगरीः

> देव आला देवाच्या घरी
> उभारली नवी पंढरी।

या ओळी तशाच रेंगाळत राहिल्या. काहीतरी विशेष वाटत होते. अत्यंत खोलवर गंभीर आणि अर्थपूर्ण असे जाणवू लागले. काहीतरी घडणार याची चिन्हे दिसू लागली आणि दोन तीन दिवसानंतर सर्वच्या सर्व कविता तेथे एकदम आकाराला आली. मराठीत लिहिण्याचा सराव अजिबात नाही आणि एकप्रकारची साशंक भीतीही होती. तरीदेखील हा चमत्कार झाला. कुणाच्या ध्यानी मनी होते ते? बहुतेक कुठेतरी ठरलेले असावे.

लगेच ती कविता जाणकार चारचौघांना पाठविली, ब्लॉगवर प्रकाशित केली, thewindsofwonder-org/. प्रतिसाद प्रोत्साहक होता. तिचे लयबद्ध गायनही झाले. काही कवितांचे इंग्रजीतून भाषांतरही झाले. त्या गोडव्यात पांच सात कविता सहज आल्या आणि वाटले आपण पंचवीसची मजल गाठावी. त्यात एकप्रकारची परिपूर्णता राहील. ह्या प्रकारच्या शैलीचे पक्केपणही स्थापित होईल. २६ जानेवारी २०२५ ते ३ एप्रिल २०२५ ह्या काळात प्रकटलेल्या रचना पाहता मग यशस्वीपणाची खात्री पटली. धाडसही वाढत गेले.

पण हे इथेच का थांबवावे हा प्रश्न डोळ्यासमोर दिसू लागला. त्याचे कारण साधे आणि सरळ आहे. सोपे आहे. कवितांची रचना एकाच साच्यात पडू नव्हे

हे उत्कटतेने वाटू लागले. तेच ते भाव पुनरावृत्त होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. निराळी शैली आणि निराळी स्फूर्ती व प्रतिभा असाव्यात ह्याची जाणीव प्रकर्षाने झाली. पुढे कसे घडेल हे आता सांगता येत नाही. नवीन आविष्कार यातच स्फुरण आणि काव्याची सफलता सामावलेली आहे.

मला मराठीतून काव्य लिहिणे हे तेवढे सोपे वाटले नाही. कधीच काहीही लिहिले नाही आणि हा प्रयास, ही हिम्मत, हे साहस, आपल्या धैर्याच्या पलीकडचे तर नाही ना हे खटकू लागले. आत्मविश्वास तसा जबरदस्त नव्हता. त्यात मराठी टंक लिखाण अवजड आणि कष्टाचे. इंग्रजी कीबोर्ड वरून देवनागरी लिपीत लिहिताना ओघ येत नव्हता. इंग्रजीतून जे सहज दहा मिनिटात होते तेथे अर्धा तासही लागतो.

पण त्याचवेळी उत्साहपूर्वक सहाय्यही मिळाले. त्यात विशेष उल्लेख करावा लागेल तो म्हणजे माझे नाशिकचे अनुभवी आणि तज्ञ स्नेही अरूण K यांचा. जसजशा कविता आल्या तसतशा मी त्या त्यांना पाठवू लागलो. त्यांनी मराठीचे केवळ ह्स्र्व-दीर्घच पाहिले नाही तर इथे तिथे अचूक शब्द निवड आणि भावसूचनाही केल्या.

पण सर्वात मोठी गोष्ट त्यांनी केली ती म्हणजे प्रस्तावनाच्या बाबतीत. नाशिकचे श्रीयुत स्वानंद बेदरकर या महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, संपादक आणि वक्ते यांच्याशी परिचय घडवून आणला. त्यांच्याशी संपर्क साधून त्यांनी हे मोठे आणि प्रशंसनीय यश मिळविले.

श्री बेदरकर यांनी लिहिलेली प्रस्तावना अप्रतिम आहे. प्रगल्भ आहे. एवढ्या चटकन लिहिली. अभ्यासपूर्वक आहे. मर्म ओळखणारी आहे. उद्याची कविता कशी असावी हे सांगणारी आहे. मराठीत नवे दालन उघडण्याच्या दिशेने नेणारी आहे. त्यात सर्व सार्थक आले. माझी ओळख करून देताना ते म्हणतातः “ते मूळचे मराठवाड्यातील आणि मराठी आहेत.” मी हे थोडेशे वाढवील आणि म्हणेनः “ते मूळचे मराठवाड्यातील ऋग्वेदी देशस्थ मराठी आहेत.” असे नमूद करण्यात एक प्रकारचे विशिष्ट संस्कार दिसून येतात, संगोपन, एक प्रकारची घडण दिसते. जन्म घेताना तो जसे काही हे सर्व ठरवूनच येतो. हा घरगुती ठेवा देखील परंपरेच्या दृष्टीने मौल्यवानच म्हणता येईल. आपण काही न लिहिलेली

कोरी पाटी असे येत नसतो, not a blank slate. पूर्वीचे साठवलेले आपल्या बरोबर असतेच.

या उत्स्फूर्त आणि प्रांजल सन्मान-पुरस्काराबाबतीत मी ह्या दोघांही प्रतिष्ठितांचे हृदयपूर्वक आभार मानतो. धन्यवाद. ब्लॉगवर आलेल्या प्रतिक्रिया करणाऱ्यांचेही अनेक अनेक आभार.

खरे म्हणजे, शेवटी, हे सर्व करवून घेणाऱ्यांचेच अनंत आभार. कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग असेल तर तो फक्त आनंदी असण्याचा. त्याच्या प्रती हाच आनंदाचा सोहळा.

आनंदाचा प्रासाद आनंदाच्या पायऱ्या
आनंदाचे पंख आनंदाच्याच भराऱ्या।

उसळे अथांग महासागर आनंदाने
वाढवीत लेवीत पर्वणीचे शुभ लेणे।

आनंदाचे अलंकार आनंदाची ख्याती
गगन तोकडे म्हणून पृथ्वीची महती।

आनंदाची प्रतिष्ठा यज्ञयाग रात्रंदिन
आनंदात अग्नितेजाचे उगम स्थान।

आनंद-अग्नि अमृतदेह ठरवे
साहसी आनंद दिव्य जीवन घडवे।

साहसी आनंद दिव्य जीवन घडवे. हे होणारच

आर वाय देशपांडे
१७ एप्रिल २०२५

## ०१ः देव आला देवाच्या घरी

देव आला देवाच्या घरी
उभारली नवी पंढरी।

सोने उगवले शेतीभाती
प्रेमपूर्णेची दुथडा भरती।

रात्र नसे तरी दीपोत्सव
अद्भुत किमया की सर्व।

बहरले विशाल प्रांगण
चिवचिवाट हर्षाची गुणगुण।

सडा चोहीकडे प्राजक्ताचा
फोफावला वृक्ष आनंदाचा।

देव आला देवाच्या घरी
खायी आवडीची भाकरी।

चौतन्यनगरीचा देव
वाढवी समृद्धीचे वैभव।

२६ जानेवारी २०२५

## ०२: साखरखेड्याची गोष्ट

दाट वनराईच्या पलीकडे
आर्यभूषित साखरखेडे।

आनंदाचा गोडवा साखरेचा मळा
स्मित-आश्चर्यांचा सोहळा।

गुरूहाळी गर्दी देवगणांची
बैठक भरली सप्तस्वरांची।

हांक तुतारीची आसमंतात
थवेच्या थवे नील गगनात।

मिथ्यापण नसे मृत्यू नसे
अग्नितप्त देहची असे।

मधुरच सृष्टी माधुर्याची
उगमाकडे धांव उगमाची।

अद्भुत चौत्यपुरुष घडवी
अमृतत्वाची थोरवी।

५ फेब्रुवारी २०२५

# ०३: येई शुभांगी

इथे तिथे जाई जुई मोगऱ्याचा उल्हास
कोण म्हणे हा तर भ्रम, हा तर आभास?

खळखळा वाहे स्वरास्वरांचा आनंद
अद्भूत महाकाव्याचा आल्हादिक नाद।

नसे खोटेपण, अस्तित्व हे केवळ सत्याचे,
माळरान दरीडोंगर सर्वत्र वास्तव्याचे।

अणुरेणूत तीच प्रतिष्ठा, तोच थोरलेपणा,
प्रफुल्लित जशी असे ही हसतमुख प्रेरणा।

सप्तगंगेच्या काठी बसली महापंगत
आवडीचेच पक्वान्न, सुगंधी केशरभात।

दीप्तिवन्त वरुण इंद्र अग्नि सवितृ भग मित्र
प्रसन्नतेचा ध्वनी घुमे नवगायत्रीचा सर्वत्र।

उधळीत गुलाल येई शुभांगी मंगलदायिनी
अमरत्व श्रेष्ठतेचे वाढवित ह्या मृत्युस्थानी।

१३ फेब्रुवारी २०२५

## ०४: दृढावे संकल्प प्रेमाचा

खरेपणाची चढती चढती भरारी
ही तर नीळनभी वाढे सावली गोरी।

मोहोर असे गच्च थोरल्या वृक्षाचा
आल्हाद खोल खोल आंतरिकतेचा।

स्वैर फुलपाखरांचा स्वानंद
धाव सरितेची निवांत निवांत।

नसे काही खंत ह्या जगण्याची
नसे थोडीदेखील आस्था जगाची।

क्रूर प्रबळ मृत्यू काय म्हणे:
"अहो माझेचि हे तर सर्व करणे"।

म्हणूनच महिमा कालगतीचा
आणि दृढावे संकल्प प्रेमाचा।

भल्या नियतीची आश्चर्य-तयारी
नभी-धरणी ही तर सावली सोनेरी।

१७ फेब्रुवारी २०२५

# ०५: गगनातला सूर्य अंगणात आला

गगनातला सूर्य अंगणात आला
दिव्य झेपेने मोठा संकल्प साधला।

चमत्कार हा निश्चित नव्हे अद्भुत
अहो उमलला सोनचाफा वाळवंटात।

बहिरे जडत्व ऐके गाणे मधुर
शतकोटी स्वरांचे देखणे मंदिर।

होती प्रेरणा योगी अग्नीची
प्रखर तपश्चर्या वर्षावर्षांची।

गूढ शून्यात रूप प्रज्वलीत
कठोर दगडात प्रेरित ज्योत।

संसार नसे पण प्रपंच करारी
अमर म्हणुनच मृत्यू स्वीकारी।

इथे तिथे सर्वत्र  वास्तव्य त्याचे
देव फेडी जड ऋण धरतीचे।

१९ फेब्रुवारी २०२५

# ०६: माझे पंख आले आकाशातून

माझे पंख आले आकाशातून
आनंदाचा छंद निळा घेऊन।

थवेच्या थवे उत्फुल्ल कल्पनेचे
शून्यातून पसरे विश्व संपन्नतेचे।

भरारी उत्तरेस दक्षिणेस
चोहीकडे घेत रसांचा रस।

मुग्ध झुळूक वाऱ्याची जांभळी
झरण्याची प्रसन्नता ती निराळी।

नदी नाले पुष्कर तळे अहो हे सर्व
बृहत् सागराचेच अनोखे कर्तृत्व।

रात्री रंगले स्वप्न तारकांचे
जागेपणी रसाळ काव्य उद्याचे।

आणि कालांतराच्या प्रहरी
विस्मयाचा गोडवा येई भूवरी।

२१ फेब्रुवारी २०२५

## ०७: सावित्री प्रियतमाच्या शोधात

रथाची चक्रे होती धावत धावत
प्रेमपुरीच्या आंतरिक शोधात।

राजवाडे शहरे खेडे पाडे तीर्थक्षेत्रे
पडले सर्व मागे, निकटचे, होत्रे-गोत्रे।

दरीखोऱ्यातून नाद येई आनंदाचा
सारे सजले, जल्लोष उत्सवाचा।

हृदयी उजाडली उषा ही नूतन
दूरच्या भविष्याची प्रसन्नता घेऊन।

बहरला ऋतू मधुर हर्षाचा
संहार एकवटला वर्षावर्षांचा।

अनंतकाळ वाट पाहत होता,
या क्षणाची, मृत्युस न जुमानता।

मधुवतीस आलिंगले प्रियतमाने
न्हाऊन वाढले सौंदर्य सौंदर्याने।

२३ फेब्रुवारी २०२५

## ०८: अग्निशिखेचे आगमन

उंच टेकडीवर आहे माझे घर,
आजूबाजूला सारे हिरवेगार।

भली मोठी बाग पिछाडीला,
सगळीकडे पक्षी कुतुहलाला।

नजिकच प्रवाहांची खळखळ,
वाऱ्याच्या हाकांना होकार मंजुळ।

शब्द ऐकू येई भल्या अज्ञाताचा
अद्भुतातून प्रतिसाद मौल्याचा।

उलगडले रहस्य महान श्रुतीचे
दगडाच्या उरात इच्छाशक्तिचे।

निश्चित येईल ज्याला जन्माला
ख्यातीचा संकल्प साधण्याला।

बांधला सप्तरंगी पूल आकाशात
आणि शिरे अग्निशिखा घराघरात।

२७ फेब्रुवारी २०२५

# ०६: जांभळा रंग गहिरा

जांभळा रंग गहिरा, जांभळी पहाट,
गोड हसे उत्कंठा बघत आशेची वाट।

उमले मोगऱ्याच्या शुभ्र कळ्या अंतर्देही
सुगंध भावनांचा कल्पकतेच्या ठायी।

प्रभात उगवे उदात्त भविष्याची
काय ठरविले होते पूर्वी घडे तेची।

नियतीने घेतली झेप अचानक मोठी
जुने प्राचीन गुणधर्म बदलण्यासाठी।

रात्रीचा न होई स्पर्श चंद्र-तारकांना,
क्रियाकृतीत खोटारेपणा येईचना।

ती बंधने, गळुनी पडे मनाच्या शृंखला,
मुक्तता नव्हे मोकळीक कर्तृत्वाला।

सूर्य उतरे समईच्या अखंड वातीत
अस्तित्वाचे वास्तव्य घरा-घरात।

२८ फेब्रुवारी २०२५

# १०: किरमिजी पंखाचा पक्षी

डहाळीवर नवीनच पक्षी बसला होता
आला काही रहस्य शोधता शोधता।

आवाजात आर्तता होती उत्सुकतेची
स्वरात भाव-किमया नवनिर्मितीची।

पंख होते चमकदार, किरमिजी,
दीप्तिवन्त, दिव्य अग्निचीच तेजी।

निद्रा आहे म्हणूनच स्वप्न चंदेरी
तो आहे आणि त्याचीच गैरहजेरी।

आनंदाच्या भरात होई वेदना
वाढवीत वाढवीत परस्परांना।

अमरत्वाने स्वीकारले मृत्युधन
घडविण्याशी जडत्वाचे परिवर्तन।

समृध्दीचा वाकबगार इथे आला
देहाचे चौतन्यत्व प्रतिष्ठापणाला।

३ मार्च २०२५

## ११: हवे ते इथलेच

जे सांगायचे होते ते सांगून झाले,
पण होते ते अंतरावरील, पलीकडले।

हवे ते इथलेच, हिरव्या रानांचे,
गुराढोरांचे, वाहत्या नदीनाल्यांचे।

मुक्ति असावी रामरगाड्यापासून
जन्म-मृत्युचे जड बंधने तोडून।

पाहिजेत साखळ्या निखळलेल्या,
अज्ञानाच्या सीमा ओलांडलेल्या।

तर खरी होई जीवनाची सुरुवात
अग्नि घेई सर्व त्याच्याच हातात।

हवे ते इथलेच, आनंदाने दाटलेले,
बुधवारच्या बाजारात गजबजलेले।

स्वीकारायचे आहे गूढ भूमीमधील
शोधण्याशी मूल्ये दगडामातीतील।

५ मार्च २०२५

# १२ः चांदण्याचे गुपित

आली अंगणात रुपेरी चांदणी
नेसुनि केशरी झगझगीत पैठणी।

माणिक-मोत्यांचा हार गळ्यात
मिष्किलता गालीच्या खळीत।

पैंजण पायात ठरवी कालगती
रागसुरात चाले चाले नियती।

भविष्यवाणीने सांगितली थोरवी,
वसे सर्वत्र ऋतंभरा, गावोगावी।

म्हणूनच आले मी अंगणात
चांदण्याचे गुपित उकलीत।

सांगे ती, आंतरात  जशी मी जाई
प्रज्ञा तिथे देखील प्रत्ययास येईं

ऐश्वर्य लेवूनी ऐश्वर्यच वाढे
विपुलता इथे तिथे चोहीकडे।

७ मार्च २०२५

## १३ः चंदनाचे झाड

चंदनाचे झाड वाढले मागे परसात
पसरे फुलांचा सुगंध जगभरात।

हांक ती तर हर्षध्वनिने दिलेली
उल्हसित उत्कंठेला लाभलेली।

निःशब्दतेत झाला स्फोट गंभीर,
वाहू लागली धन्य स्तुती झरझर।

हासत नाचत येई उद्याची कविता
अर्थगर्भित भविष्याचीच संहिता।

सहाणेवर उगाळले मंत्र नवे नवे
शतकोटि देवतांची घेत नावे।

वाढे भव्य चंदनाची वैभव-घनिष्ठा
सर्वत्र रक्त चंदनाचीच प्रतिष्ठा।

चंदनाचा प्रपंच, चंदनाचे हावभाव,
चंदनाचा देव्हारा, चंदनाचाच देव।

६ मार्च २०२५

## १४ः येई क्रियाशील श्रेष्ठा

येई क्रियाशील श्रेष्ठा ब्रह्मपुरीहुनि
योगियाचा महा आदेश घेऊनि।

गर्द उत्साहाने मोहरले आम्रवन
उत्स्फूर्त कोकिळ गायी तिचे गुणगान।

जणू काही पेरले तिनेच नकळत
सोनियाचे बी नांगरलेल्या शेतात।

उगवे अग्निसत्त्वाचे धनधान्य
नवतनुचे तेजःपुंज अमृत-अन्न।

येई विपुलता तिच्या आगमनाने
हर्षभरित सौंदर्य तिचेच असणे।

अगाध दिव्य अवतरे मृत्युप्रांते
आविष्कारे संकल्पिले होते ते।

देहरूप बदले चेतनेप्रमाणे
विधात्याची इच्छा तिच्याच करणीने।

११ मार्च २०२५

## १५ः आनंदाचा सोहळा

आनंदाचा प्रासाद आनंदाच्या पायऱ्या
आनंदाचे पंख आनंदाच्याच भराऱ्या।

उंच उंच चढे शुभ्र आनंदाचे शिखर
धवलगिरीचे आनंदी पुण्य भूतलावर।

आनंदाच्या वस्तीत आनंदाचा सोहळा
उत्तुंग आनंद सर्वत्र सोन्याहून पिवळा।

उसळे अथांग महासागर आनंदाने
वाढवीत लेवीत पर्वणीचे शुभ लेणे।

आनंदाचे अलंकार आनंदाची ख्याती
गगन तोकडे म्हणून पृथ्वीची महती।

आनंदाची प्रतिष्ठा यज्ञयाग रात्रंदिन
आनंदात अग्नितेजाचे उगम स्थान।

आनंद-अग्नि अमृतदेह ठरवे
साहसी आनंद दिव्य जीवन घडवे।

१५ मार्च २०२५

## १६ः सुवर्ण ज्योत

धडाडली संध्याकाळी ध्यानप्रांगणात
अचानक प्रशांत बुधवारी सुवर्ण ज्योत।

प्रगल्भ प्रेरणा बाळगून मोठ्या उद्याची
लखलखे सप्तभुवनीं क्रिया-चेतना तिची।

कल्पिले होते विसरलेल्या काळात
साकारे आता दिव्य योग-प्रतिज्ञेत।

गेले प्राकृतत्व जीर्ण होणाऱ्या वस्त्राचे
न होई शेवटी राख भस्म ह्या देहाचे।

अतप्त तनु तो करुनि प्रज्वलित
प्रस्थापे हिरण्य प्रकाश अणुरेणूत।

अंधाराचे रूप भयानक करोनि नष्ट,
उघडे करी त्याचेही दडलेले वैशिष्ट्य।

कर्तृत्व अभिवन्दनीय मृत्यूलोके
सत्य जीवनच बाहेरी-आंतरिके।

१८ मार्च २०२५

# १७ः झोप होती माझी लांबलचक

झोप होती माझी लांबलचक
घडवीत न संपणारे स्वप्न एक।

गंभीर सूचक होते दाहीहि क्षण
दशदिशांचे ध्वनि एकवटवून।

ऐकू येत होते अपेक्षेचे सुरेल नाद
शब्दांचा अर्थ साधित शुभ संवाद।

प्रसन्न खोल तळ्यात झळकत होती
पवित्र कमळे सांगत त्यांची कीर्ती।

नसण्यापासून आले हे सर्व असणे
चमत्कार सुप्ततेत हो, तिचेच करणे।

पलिकडे वसलेली होती नगरी
अमरत्वाची ठेवी उभी, उत्फुल्ल, खरी।

काळाने कमावले आपले ध्येय
त्या झोपेच्या परिपूर्णत्वाचे श्रेय।

२२ मार्च २०२५

## १८: स्वर्ण प्रभा झळके ह्या भूमंडळी

सत्य नव्हते असे नाही, सर्वदा आहेच,
त्याचाच धर्म, मंगल रचना त्याचीच।

तो दाखवी मार्ग अनंताचा अनंतात
करुनि विस्तृत ब्रह्म अधिक विस्तृत।

घेतली सूत्रे हाती महत् अग्निप्रज्ञेने
श्रेष्ठत्व वाढविले, भविष्य भविष्याने।

स्वर्ण प्रभा झळके ह्या भूमंडळी
सर्वत्र गढद आनंदी गुलाल उधळी।

विजयी ध्वज फडके शिखरावरी
महोत्सवाचा रंग उल्हासक शेंदुरी।

जीवन केवळच नव्हे, देह देखील
ईश्वरत्व आपल्याठायी जोपासेल।

हे अग्ने, धन दिव्य सृष्टीचे तुझेची
करविता भोक्ता अधिष्ठाता तूची।

२४ मार्च २०२५

## १६: नांगरणीत सापडले अद्भुत भांडार

नांगरणीत सापडले अद्भुत भांडार
पुरातन अग्निचा प्रज्वलित हुंकार।

येई ऐकू ध्वनि भूमिच्या गर्भातून
दिव्यत्व येत आहे दगडामातीतून।

होती प्रखर साधना युगायुगांची
ईश्वरी धारणा कृतीत आणण्याची।

संपल्या वेदना, क्लेश अज्ञानाचे,
गेले याचकपण, कठोरत्व मृत्युचे।

अवतरले चौतन्याचे प्रकाशमन
आनंदली पृथ्वी स्फूर्तीने न्हाऊन।

उद्यान उमललेले  छंदांच्या लयीत
खळखळणाऱ्या ओढ्याचे रसाळ गीत।

प्रेरणा होती निखळ आविष्काराची
सार्थकता प्रशांत सृष्टि निर्मितीची।

२६ मार्च २०२५

## २०: प्रभु इच्छा – हाचि संकल्प

निर्जिवत्व नव्हे जागृत स्तब्धता
देहाचे समर्पण, काही न ठेवतां।

नसे संकल्पना, नसे गंभीर भावना,
फक्त क्रियाशील उज्ज्वल चेतना।

ज्याचे व्हावयास पाहिजे त्याचेच
गंगेच्या जळाचे अर्घ्य गंगेचेच।

घोर अंधाराचे ओझे नाहिसे झाले
पण ते होते उद्देशानेच भारलेले।

काळोखाच्या  दरडीतले घबाड
नाही कोणत्याही नजरेच्या आड।

निर्वाणाची हाक, अस्तित्वाचा शोध
शून्यातले  सामर्थ्य  रहस्यमय बोध।

प्रभु इच्छा – हाचि संकल्प, हाचि ध्यास,
मंत्र नवप्रकृतीचा अजर जोपासण्यास।

२८ मार्च २०२५

## २१ः नवमानवाचे आगमन

अमृताचा ठेवा देहाची सार्थकता
खटाटोप मोठा धैर्य न ढळता।

अचानकच घडले एके दिवशी
दैवाच्या उंचावल्या राशीच्या राशी।

फुटला सोन्याला टवटवीत अंकुर
कधी न होणारे स्वप्न झाले साकार।

उद्याच्या उरात आहे चिरकाल प्रकाश
धजे न तेथे अंधत्वाचा एकहि अंश।

कुंठल्या अपहृत नियतीच्या विवंचना
उद्ध्वस्त झाल्या खोटेपणाच्या रचना।

चौतन्यरूपाचा अद्भुतच उत्सव
ऐका ऐका हो येत आहे नवमानव।

जवळचे दूरचे विशाल दृष्टि पाही
त्याच्या शिवाय दुसरे नसे काही।

३० मार्च २०२५

## २२ः मीच अनंताची गुपिते धारणारी सृष्टि

नसे केवळ जिज्ञासा उत्कट जीवनाची
आहे भावना आंतरिकतेच्या साफल्याची।

रज्जु-सर्पाची कालची गोष्ट आहे खोटी
मोठा भ्रम जाय, सत्यचि सत्याच्या पोटी।

प्रोत्साहनाचा वाहता मधुर हा ओहोळ,
अमृतचि, गोडी भोक्त्र्याची, चोखंदळ।

आले दुरून चाहते, रसज्ञ, गुणवंत,
न दिसणाऱ्या तारकांचे कौतुक सांगत।

एक म्हणे मी आहे छोटी पण झंझावाती
माझ्र्या तुफानी डौलात पर्वतहि झुलती।

पहा पहा ग्रंथांचे भांडार, गूढत्वाची रास,
प्रज्वलित माझे कर्तृत्व, थोरले हमखास।

मी आहे अंतराळातून आलेली नवी दृष्टि
मीच अनंताची गुपिते धारणारी सृष्टि।

३१ मार्च २०२५

## २३ः बारा मोत्याचा मुकुट

शुभ्र बारा मोत्याचा डोईवर मुकुट
लखलखीत अलंकारांचा सम्राट।

बारा चक्रे झाली जागी, बारा कमळे,
खाली-वर, सामर्थ्य कुठेहि न ढळे।

ठरली भविष्याची नवी रेषा, नवी दिशा,
उमलल्या प्राजक्ताच्या उल्हसित अपेक्षा।

दैवी संपदा वाढवी वैभव जीवनाचे
अमरत्व लेऊनि रंग रूप चौतन्याचे।

स्विकारले तिने मृत्युत्व त्याचकरिता
अग्नितेजाने जिंकण्यास देहाची अपात्रता।

संपली असुसंगता, सारी अप्रसन्नता,
स्वरांचे बोल सांगे स्तब्धतेचि गहनता।

नवीन पोशाख प्रकृतिने केला परिधान
चौतन्यमयि सृष्टिला होकार तिचा महान।

१ एप्रिल २०२५

## २४ः मी इथे का आलो?

माझे स्वत्व मी ओळखले एके सकाळी
उमलत होती स्वप्नात परदेशी कळी।

सुगंध होता निळ्याभोर आकाशाचा
युगायुगांचा प्रयास गाठीत हर्षाचा।

आली होती ती आनंदमय उद्यानातून
हसरे मुख सौंदर्य आतून बाहेरून।

स्वप्न झाले जागे प्रसन्न नित्यत्वात
तिच्यामुळे झाली कर्तृत्वाची सुरुवात।

अज्ञानाच्या जड शृंखला न जुमानता
मी इथे आलो का, कळले हे मला आता।

उत्सुकता अंधाराचे गुपीत जाणण्याची
कारणास्तवच असे घडण ह्या प्रपंचाची।

हवेसे वैशिष्ट्य आहे माझेही त्यात
थेंब राहे थेंबचि अथांग सागरात।

२ एप्रिल २०२५

## २५ः सत्यवान – पृथ्वीचा आत्मा

स्वीकारूनि पकड विकृत मृत्युचि
काळाच्याहि पुढे पाऊले जाती त्याची।

बंधने घेतली प्राज्ञ हेतू पुरस्कारून
महाद्वार उघडे मोठा विजय मिळवून।

अगाध संहिता केली होती आत्मसात,
अध्यात्म प्रज्वलित होऊनि जड देहात।

आराधना नव्हे केवळ आत्मोन्नतीची
क्रियाशीलता जीवनातहि दिव्यत्वाची।

अभ्यासले प्रकृतीचे गुणधर्म, तिची धारणा,
आहे तेथे देखील उद्याची प्रगल्भ प्रेरणा।

धावे त्याच्याच मागे मधुमन्त सरिता
किलबिलाट सांगे, ही आली प्रफुल्लता।

नाद असे भविष्याच्या संगीताचा
सर्वा ठायी दरवळे सुगंध चंदनाचा।

३ एप्रिल २०२५

# दही




13 April – 14 May 2025

## ०१ः हे स्वप्न मला कळले

दुःख क्लेश न उरले अज्ञानाचे
बंधने तुटली संकीर्ण हृदयातील;

जाउनी सगळी बोचरी क्षुद्रता
भूमिगत खोल सापडे रत्नभांडार;

काळोखाच्या गुहेत लख्ख उजेड
हर्षित कोजागिरीच असे जशी काही;

अवतरे सौंदर्यमयि आल्हादिनी,
डोले नुपूरांच्या झुणझुणित सृष्टी सारी;

विद्रुपता कुठलीही नसे भावनामधे,
नसे कुठेही तुच्छ खोटी प्रेम-माया;

फळाफुलांनी लदली भरगच्च बाग
स्वर जाती दूरवरी घेऊनी स्वैर पंख;

पण हे कोडे मला कळलेच नाही, –
अश्वाची धाव अग्निबाणाच्या गतीची;

जे दिसते त्याच्या खूप पलीकडे, खूप,
असे दृष्टी पोहोचणारी योगचक्षूची;

अद्भुततेच्या पुढे आहे मोठा विस्तार,
आनंदाचा, समृद्धीचा, दिव्यत्वाचा;

चौत्यनाची इच्छित रूपें करुनि धारण
आहेत ज्ञानीजन अग्नितेजाचे तेथे;

म्हणूनतर घेतला मी जन्म मृत्युलोकी
ध्येय घडवीत घडवीत गाठण्या अमरत्व;

अहो हीच तर सार्थकता निर्मितीची,
प्रयास नसे तो, आनंद आविष्काराचा.

१३ एप्रिल २०२५

## ०२: अनेकत्वाची धारणा

संसार करण्याकरिता तर आलो मी इथे
न बदलणारे ठेउनी बाजूस, माझे चिरत्व;

वाढती विपुलता सगळीकडे, वाढतेपण,
विस्तार सर्वही दिशां, चंदेरी प्रवाळ निळ्या;

सागरात उडी शोधण्या त्याची अद्भुतता,
किंवा मृत्यूमुळे आरोहण सप्त शिखरि;

ऐकता शांत नाद आंतरीचे अनाहत
खोल गहन होई निराकार स्तब्धता;

तिच्याही पलीकडे आहेत अनंत रूपे
येण्याकरता बाळगूनी अपेक्षा उत्साही;

अहो, मोठा खटाटोप तेच घडविण्यार्थ,
हा प्रपंच मांडीला वसविण्या अनेकत्व;

पसारा नव्हे, असावी आनंदाची विविधता,
कारणीभूत हीच इच्छा, घट्ट संकल्प;

शतपरिमाणांसह उभी असे ही रचना,
एकाच रंगातुनी फैलवीत असंख्य रंग रंग;

घेऊनि परम चौतन्य अंगी, हो ठरे अंगी
चौतन्याचेचि अंश, प्रखर प्रज्वलतेचे;

संसार करण्याकरिता तर आलो मी इथे
न पडता संसारात साधण्या संसारत्व.

१५ एप्रिल २०२५

## ०३: बकुळेची फुले

आलेली आहेत ही फुले तेथून जेथे
न पोहोचे ही दृष्टी, चपळ कल्पना देखील;

सुगंधी प्रांत तो हौसेच्याही पलीकडचा,
सौंदर्याचा, प्रेमाचा, अनोखा, अवर्णनीय;

येऊनि वाढविण्यास रात्रीची वैशिष्ट्ये
हिरेमाणिक चमकती तारकामंडळातही;

भावना आल्हाद दगडामातीत रहस्याचे
गाते गुणगान मधुर रसवंती, ती प्रवरा;

येई घेऊनि स्वाद अंधाराचा प्रासादिक
निर्मळतेच्या हृदयी झळझळे पावित्र्यच;

नसे आजारपण द्वेषाचे वा तुच्छतेचे,
नाही स्पर्श फुलांना कुठल्याही क्षुद्रतेचा;

पसरे त्याउलट साफल्यच रंगारंगातून,
वेगवान तंतूतंतूत चमत्कार रेशमी;

लेशालेशाच्या ठायी, शब्दांच्या लयीत,
रूपारूपात परिमल मधुर हर्षाचा;

विषमातील सहजता, सा-रे-ग-मचा सुवास,
दरवळे देहाच्याही जड हाडामासात;

धावत ओलांडे ऐरावत  सप्तवर्णी पूल
सोनेरत्नांचा सुगंधी हंडा जिंकण्यास.

१६ एप्रिल २०२५

## ०४: जांभळीच्या खाली

जांभळीच्या खाली बसला होता हत्ती
सांगे मौज अधिकतेच्या रहस्याची;

छोट्या घटात आकाश होई मोठे मोठे,
आणि म्हणे, अपूर्व महानता आहे इथेही;

जांभळीचा प्रभाव असा की मी देखील
करी धारण रूपे रूपे , चौतन्याप्रमाणे;

करे काय मरन? करे काय रिपू? काळ?
मी असे मुक्त, मोकळा सर्व बंधनातून;

झालो मी जसे व्हावयास पाहीजे तसा,
ह्याच कारणास्तव घेतला जन्म ह्या स्थायी.

१६ एप्रिल २०२५

## ०५: संकेताचा शब्द

सकाळी सकाळी घेऊनि पहिले उड्डाण
आणिला संकेताचा शब्द नारद श्रेष्ठांनी;

असे तो विधात्याच्या निर्णयाने घट्ट
होणार त्यातून प्रारंभ नव्या युगाचा;

संपताच चक्र ऋतुंचे नेई अटळ मृत्यु
त्याच्या अंधारघरी प्रेमाच्या आत्म्यास;

योजना असे तेथे भविष्याची खोल, गूढ,
आणण्याशी दैवावर विजय मिळवून दिव्यत्व;

म्हणूनच अवतरली ती क्रियाशील भूलोकी,
सावित्री, मानुनी संकल्प तिच्या अधिष्ठात्याचा;

ओझे उचलुनी जडत्वाचे, भारी अज्ञानाचे,
कठोर दुःख जिंकले तीव्र योगसामर्थ्याने;

मागे वर विराट पुरुषाच्या जाउनी समोर,
होऊ दे, हे भगवंता, तुझाच जन्म इथेही;

आनंदातुनी विस्तारण्यास देही प्रज्वलता
पाहिजे दिव्य जीवन ह्या पृथ्वीतलावरी.

१६ एप्रिल २०२५

## ०६ः टहाळाच्या जुड्या

न्याहाळूनि त्यांचे वेधक कोवळे हिरवेपण
आणल्या शेतातून टहाळाच्या जुड्या;

त्यांच्या गोडस दुधाळ आनंदात झाले
आमंत्रित सौम्य चांदणेही ओलेचिंब;

पाहता पाहता धावे नवीनच धारणा,
साफल्याचा लहानसा प्रेमळ ओढा की;

घाई मौल्याची बाळगलेली उत्सुकता
सांगण्या पर्वताचा उल्हास सागरास;

इच्छुक टवटवीतपणा वाढे वाढे
अहोरात्र साधण्या अपूर्व कायाकल्प;

प्रसन्नताभरून होई जीवनाचे सार्थक,
उगवे हर्षित टहाळ वर्धक प्रकाशात.

१९ एप्रिल २०२५

## ०७: वाढले माझे धन

वाढले माझे धन चौऱ्यांशी पटीने,
मोहोराने बहरला मोहक आम्रवृक्ष;

हर्षीत असे नदीच्या काठी देव
छान उद्याची सकाळ आकारीत;

दूरच्या गावाहून येति गाणपक्षी,
स्तब्धतेत न ऐकलेले उत्कंठित स्वर;

लाभे खोल अर्थ काव्यरचनेला,
सांगे ते जे कधीही न येई सांगता;

देवघरात मांडीला सुरेख फुलोरा
विश्वाभरी पसरे स्वाद त्याचाचि;

लावुनी गंध भाळी कमावले हे धन,
धन्य धन्य ती पूर्णता आराधनेची.

२० एप्रिल २०२५

## ०८ः पहाडगंज

इथे विकत मिळती साखरेच्या गोण्या,
भरलेल्या दगडामातीच्या गोडव्यानेही;

एके दिवशी काय झाले भर दुपारी
भगवंतानेच घेतली गोणी पैसे देऊन;

गेला स्वगृही देण्यास प्रियेला अशी भेट,
सांगे, अगे, चमत्कार हा बघ पृथ्वीचा;

आविष्काराचा मी दिला होता सूर्य
आणि झाला चिन्मय पार्थिव देहही;

अमृतपाण्याने वाढवलेली ही साखर
मिळे ह्याच विस्मयकारी मृत्युलोकी.

२० एप्रिल २०२५

## ०६: अभिवेगाचा जन्म

(विचाराचे मूळ – सावित्रीचा अनुभव)

ऐकले आवाज अंधारदरीतून येणारे
आणि पाहिलाही प्रकाश उंचावरचा;

पण होई कुठे जन्म ह्या अभिवेगांचे
हे गहन गूढ जाणण्यास पाहे वाट ती;

असे एकतर सूक्ष्म देहात त्यांचा उगम
अथवा भल्या वैश्विक क्षेत्रातूनी येति तें;

विलक्षण ओठ, अद्भुत डोळ्यांनी तेजस्वी,
असे ह्या नग्न विचारांचे मूळ आत्म्यात;

किंवा शोधत जीवन, प्रेम, उत्कट सत्य,
पडे बाहेर स्मिताचा चेहरा हृदयातून;

भुवया ओलांडून एक दर्शनशील विचार,
विचार, चमकणारे देवदूत मेंदूच्या मागे;

लखलखीत कवच घालून, प्रार्थनेचे हात जोडून,
ओती स्वर्गाचे किरण पार्थिव स्वरूपात;

आल्या उफाळून छातीतून कल्पना,
अलौकिक सौंदर्य, परम आनंदाचे स्पर्श;

घशाच्या संवेदनशील केंद्रावर आक्रमत
मूक अव्यक्त प्रतिध्वनी घूमती त्यांचे;

नसामासातून वाहती तें अभिवेग
उत्फुल्लूनी प्रभावी वक्तव्याच्या आकृत्या.

२२ एप्रिल २०२५

# १०ः चेटकिणीचे भवितव्य

पहा बसलेला ह्या फांदीवर सुंदर पक्षी,
लखलखीत, पट्टा लालसर गळ्याखाली;

आत्मविश्वास असे त्याचा इथे येण्यात,
महत्प्रेरणेने स्फुरित दिव्यत्व साधण्या;

सांगे एक मौज काय विचित्र घडले एकदा,
भेटली होती रात्री काळी विद्रुप चेटकीण;

म्हणे, जाण हे पक्के, अधिक मास संपता
मृत्यु तुझा अटळ आला जरी तू तेथून;

निर्णय माझा नव्हे, काळाचीच नक्की यंत्रणा,
नसे सुटका दैवगतीतून भल्याभल्यांचीही;

पण होतो मी निर्धास्त, आंतरिक निश्चितेत,
घेत हिंदोळे सोनचाफ्याच्या डहाळीवर;

अग्निकुंडातुनी उगवला होता हा अमर वृक्ष,
शुभत्वाने वाढविलेला, स्पर्श न होई कशाचा;

अद्भुत अस्मानी तेज माझे, न छेदती शस्त्रे,
न जाळे पावक, देहही असे प्रज्वलीत;

नसे तिच्याजवळ प्रतिभा, संज्ञा संपदा,
त्रिकालदृष्टीच्या पलीकडचे पाहण्याची;

मग कसा ठरे तिचा शब्द खरा, अज्ञानी ती?
मी मुक्तच नव्हे, चौतन्यात आहे क्रियाशील;

लहान कक्षेत न बांधलेला, श्रेष्ठ मी, महान,
दिव्यत्वाचा परम अंश दिव्यत्व वाढविण्यास;

एके दिवशी काळी चेटकीणही होईल सोनेरी,
सोन्याची फुले वेचण्या सोनचाफ्याखाली.

२३ एप्रिल २०२५

## ११: ही सौंदर्ययुवा उषा

आली ही पहाटे हेमकन्या सौंदर्ययुवा, उषा,
वाढवे ती प्रकाश, न मावळणारा सूर्य घेऊनी;

विस्तारित चौतन्यप्रभा, प्रज्वलतेच्या आकांक्षा,
सिद्धरूप करण्या पार्थिवता होई तिचे आगमन;

आत्मा तर, मोत्यासमान आहे देह देखिल,
प्रख्यात, पिते जशी ती दूध ढवळ्या गायीचे;

अज्ञानाचे असे ज्ञान तिला, रात्रीच्या उदरी
विस्मयीत फाकणारी जांभळीशी झळाळी;

पारिजात, निशिगंध, रातराणी, मोगराही,
हो, सुगंधित तिच्याच प्रेमस्वरूप उल्हासाने;

अतिमानसिक विश्वसत्याचा बारा इंची पाया,
तेजःपुंज, अमरत्वाचा, तीच उभारी भूतळावर;

विशाल वरुणाचे घेऊनि अनमोल सहाय्य
मिळवी ती तृप्ती, आनंदप्रभूचा आशीर्वाद.

२५ एप्रिल २०२५

# १२ः वसंताच्या जल्लोशात

हा वसंतऋतू पसरे सर्व ऋतूत,
स्नेह आणि आनंदाची वृष्टी;

अचानक चुंबुनी पृथ्वीच्या भाळी
सौंदर्याहुनी सुंदर करी तिचे सौंदर्य;

वसंतात वर्षा लावी प्रेमाची लागवड,
जसा शिशिर आणे दवबिंदूंचा हर्ष;

कोकीळ गाये मोहोराचा गोडवा,
करे रम्य उत्सव उल्हसित निसर्ग;

उजळे थोर कल्पकतेचे वैभव,
नदीच्या नादात सागर संगीत;

ऋतुसंहार तर वसंतात सूर्याचा,
न संपणारा रंगरंगीत प्रवास;

बारा राशीतूनी फिरे कालचक्र
विजयी वसंताच्या जल्लोशात;

बहरला बागबगीचा सत्याचा
स्तुती गाजे सर्वत्र वसंत म्हणून.

२७ एप्रिल २०२५

# १३ः भविष्याचा महामार्ग

दूरच असोत तत्वयोजक, इतिहासकार,
भविष्याचा महामार्ग तर बांधे भविष्यच;

नारंगी पहाटेतूनी फटफटे आशाशील प्रकाश
आणि जाती चरायला गुरेढोरे गावरानावर;

मधट पावसाने भिजलेले हिरवेगार गवत
देई त्यांच्या त्वचेस अलौकिक उज्वलता;

श्रेष्ठ, म्हणुनी त्या आहेत, मही, गोमती,
प्रख्यात, महान सत्याच्या आविष्कारार्थ;

ठरवे आरोहण हाचि ख्यातनाम यज्ञ,
हेचि समर्पण चौतन्यशक्तीला संपूर्ण;

नियतीचा क्षण आहे मोठ्या संकल्पात,
येई त्याच्यातुनीच न ढळणारा दिवस.

२८ एप्रिल २०२५

## १४ः आणे संदेश पक्षी माझा

आणे संदेश पक्षी माझाः फाटले आभाळ,
कोसळती हिरे माणिकांच्या सरीच्या सरी;

सृष्टीच्या छोट्या संसारात बरसात प्रेमाची,
की  क्षणाक्षणांमधेही उजळे शाश्वत;

हत्ती घोडे धावती गोळा करण्याकरिता
अद्भुत वैभव, न्यारी विपुलता प्राणा-देहात;

बदले येत्या युगात प्राचीन प्रकृतिधर्म,
महाभूते अंग अंग होतील परा सामर्थ्याचे;

घडली होती जाज्वल्य धारणा योगियाची,
जडत्वात आत्मचौतन्याची कार्यशीलता.

२९ एप्रिल २०२५

## १५ः येई अग्निदेहपुत्र जन्मास

करुनि कांतिमय युगायुगांचे अमूल्य धन
उज्वल जीवन घडविण्या आणिला पूर्णयोग;

संपले कार्य रात्रीचे, दुःखाकष्ठाचे, मृत्यूचे,
कार्यक्षम अज्ञान सरे, पाऊल ज्ञानप्रान्तात;

क्षणोक्षणी निष्ठूर असे जरी युद्ध, भयानक,
संहार होई शत्रूंचा, आणि उजाडे अक्षय सकाळ;

नसे भ्रम, नसे खेळ प्रकाश-धबधब्याचा,
अग्निप्रपात हा खरा अंधारदरीत भूच्या;

दिव्य बांधणीत येई अग्निदेहपुत्र जन्मास,
विजय मृत्यूहीनतेत ठेवूनि बाजूला अमरत्व;

सार्थकता होई सिद्ध अर्थपूर्ण ह्या जगाची
प्रशंसनीयच योजना आनंदातुनी वाढे आनंद.

३० एप्रिल २०२५

## १६ः चौतन्याची तेजोमय उद्दिष्टे

देहप्रकृतीत आहे बसलेला प्राचीन मृत्यु,
पण ही तर नीव्वळ जुनी एक आखणी;

मी मरत आलेलो आहे अनेकदा, जन्मोजन्मी,
म्हणूनीच का मी मरणार आताही पुन्हा?

पूजेचे फूल संध्याकाळी होईल निर्माल्य,
साधले का त्याने त्याचे खरे मौलिकत्व?

दैवदुर्विलास ह्या संसाराचा चमत्कारिक
देहान्तात पेरलेली आहेत बीजे उद्याची;

काया नसे इथे केवळ होण्याकरिता भस्म,
हाच मृत्यु घडवे उत्कर्षित रूपे रूपे;

पण ती आहेत अज्ञानात जखडलेली,
नसाव्या त्या आणखी दुःखमय शृंखला;

निश्चितच ठरे निष्क्रिय कालचे क्रियापद
मुक्त होईल तनु काळ्या जड अज्ञानातून;

एवढेच नव्हे, हिरण्यमय अग्नि घेई देह
साधण्या तेजोमय उद्दिष्टे चौतन्याची.

२ मे २०२५

## १७: जन्मास येई उज्वल

जतन केलेले आहे मी हृदयात शुभ्र पूज्य
हसऱ्या चेहऱ्याचे, सुगंधी कल्पनेचे, सौम्य;

छानशा प्रसन्न अंगणातील बारीक पावसाने
फुलवली वाटिका प्रेमाच्या गुलाबी हर्षात;

आला अग्निपुत्र नेसून भरजरी पितांबर,
हातात तांबूस तपकिरी टाळ घेऊनि;

उद्भवणारे ध्वनी येती ऐकू निरवतेतून,
उंच मंत्रघोषात झरझर होती गोळा शब्द;

दृष्टीने मारली उडी विचारांच्याही पलीकडे,
आणि गवसला अर्थ पुरातन गूढ रहस्याचा;

शुभ्र पूज्यात साठवलेले अनंताचे भांडार,
की येई जन्मास उज्वल, चौतन्यशील शीशु.

४ मे २०२५

# १८: सुपूर्दीकरण

दडवलेले सौंदर्य घेई रूप उल्हासाचे,
प्रकृति आत्म्याची न मालवणारी ज्योत;

पुष्करिणीत आहे अलौकिक कमळ,
चिखलरेंद्याचा, निराशेचा, न होई स्पर्श;

भीती नसे चंद्रतारकांना घोर रात्रीची,
दरीत पडण्याची धट्ट्याकट्ट्या पर्वताला;

प्रेमसागरात न उतरे मृत्यु, संभव असा की
त्याच्यात कायमचा शकेल डुबू तोची;

अगाध प्रसन्नतेला नसे सीमा कुठेही,
कशाचाही किंतु न टाके पाय आडवा;

निश्चल राखाडी गेली अन्तःशोधात,
दगडामातीचे घनत्व लाल माणिक;

धागे-ना-तिन करीत नृत्य मिळवी
हिरवा पाचू अचानक आनंदधन;

संपल्या वेदना, दुःखांचे अवास्तवत्व,
घेतली सूत्रे हाती नवतम चेतनेने.

६ मे २०२५

## १६: उमगले माझेपण माझे मलाच

बसलो होतो प्राचीन आम्रवृक्षाच्या छायेत,
आणि उमगले माझेपण, माझे मलाच;

पाहता पाहता तेथे आला शुभ्रवर्णी रेडा,
आणि जसा आला लागला वदु वेदमंत्र;

सांगे, वदविले तें माझ्याकडून योगियाने,
उदात्त छंद, सुश्राव्य, महान, अर्थही गहन;

सर्वत्र, त्यांच्या लयीत फिरती विश्वाची चक्रे,
जसा अनाहत ध्वनी वेगात पसरे सगळीकडे;

पण बोले ऋषी दीर्घतमस चातुर्वाणीचें,
एकची असे इथे, त्या तिघी पलीकडे, गुहेत;

ओळखतो मी त्यांनाही पण उत्सुकता की,
अवतरेल का जगती इथे तिच्या छंदासह;

येई पश्यन्ति परावानीच्या प्रखर उजेडाने,
बघत बघत, घेत घेत, सर्जनशील आनंद;

कदाचित उमगेल तेव्हा  मला माझेपण,
सत्यात वाढण्यासाठीच तर आहे मी इथे.

७ मे २०२५

# २०: काळ्या देवदूताचे वक्तव्य

सांगे उपहासात्माकतेने काळाकभीन्न देवदूत,
आहे देव तुझा दुष्ट फरशीवर फेकणारा तुला;

काळ्या कोळ्याच्या जाळ्यात अडकलेला जीव,
म्हणतोस, आणेन प्रकाश ह्या अंधाऱ्या कोठडीत;

काय बाता करतोस उगाचची, फुशारकी नुसती,
बोले वसवी ईश्वराचे राज्य भूतलावर;

खिळ्यांनीं ठोकलेला जर देह तुझा भिंतीवर
असे खात्रीची श्रध्दा सोडव आता तूचि तुला;

ये जन्मात घेण्या आम्लद्रव कापसाच्या बोळ्याने,
कर शोषण दुर्घटनांचे, नियतीचे, प्राक्तनाचे;

भरलेला आहे लोखंडी पेला विषारी काळाने,
क्रूर द्वेषच इथे, माहित नसे थेंबभरही प्रेम.

८ मे २०२५

# २१ः प्रशांतीची लयबद्ध रूपे

हजार किलोची घंटा वाजे संथ तालात,
उंच शिखरावर, दृष्टीच्या खूप पलीकडे;

होकारार्थी ध्वनी येई त्याच्याही पलीकडून,
विवेकी, मौल्याचा, संदेश दूरच्या भविष्याचा;

प्रतिसाद मिळे हर्षित दऱ्याखोऱ्यातून,
हसती तृणबिंदू, विस्मयीत होती वनपाखरे;

शोधता शोधता शोधले गोड तुहीनाचे रहस्य,
नीळ गगनी न हतमळलेल्या उदात्त आशांचे;

ह्र्दयाच्या अथांग गुहेतून येती मंजुळ सूर
प्रशांतीने धारण केलेली लयबद्ध रूपे;

नाचे आनंदाचा मयूर हरभरी अंगणात,
सुरेख त्याचा पिसारा विश्वाचा पसारा की.

६ मे २०२५

## २२ः सगळे काही जाणणारे स्मित

आले दुरून सगळे काही जाणणारे स्मित
त्याला नसे कारण, त्याला नसे ध्येयही;

त्याचे ज्वलंत रूप आहे निर्मळ आनंदाचे,
जसे सोन्याची घागर मधुरसाने भरलेली;

ते आहे म्हणून तर मी आहे, माझे सर्वच,
गुरांचा गोठा, तेथे प्रेमळपणाचे हंबरणे;

रात्री दिवसा, सर्वदा, भरभराटच सर्वत्र,
क्षण आणि क्षण ओथंबून जाई शाश्वताने;

असत्य खोटेपणा लबाडी पाप दुर्दैव
नसे त्यांना थारा सृष्टीच्या व्यवहारात;

सौंदर्य हेच आहे त्या गूढत्वाचे कारण,
आणि तेचि करीन मृत्यूलाही परिवर्तित.

११ मे २०२५

## २३: अनाथ्यपण

कशास्तव हा सगळा खेळ, कष्टमय उपद्व्याप,
काय दिव्य साधणार ह्या प्रचण्ड खटाटोपातून?

नसे माती जल अग्नी वायू नभ, नसे भूमि,
सूर्याचाही प्रभाव होई लुप्त खोल विवरात;

किमयाच संकल्पाची की व्हावे निर्माण शून्य,
अगाध विपुलतेतून समृद्धतेतून नाहीसे सर्व;

जाणतेपण गेले, चौतन्य, सत्य, आनंदही,
अव्यक्तातून आले दुसरे कठोर अव्यक्त;

पण ह्या अव्यक्तात आहे लपलेले तेच,
अव्यक्त अव्यक्तात भरभराटण्या सृष्टी;

जीवनाने आणला त्याच्यात कार्यशील मृत्यु
अ-मरत्व घडविण्या शून्याच्याही पलीकडे.

१२ मे २०२५

## २४: अद्भुताचा उत्सव

अद्भुताचा उत्सव, अनिर्वचनियत्वाची गहनता,
चौतन्याचे धन, सत्याचे धन, आनंदाचे धन,

विराटाचे हिरण्यगर्भाचे प्रज्ञानघनाचे वैभव,
सप्तलोकाची क्षमता, सप्तभूमीचे गूढत्व,

सप्ताग्निची प्रज्वलता, सात आहुतींचे मूल्य,
सात अर्चनांची भावपूर्णता, अर्घ्यांचे प्राशण;

सात रंगांचे, स्वरांचे, सप्ततारकांची दृष्टी,
प्रत्येकीचे जाणतेपण वैशिष्ठ्यपुर्ण, तिचेच;

सप्तशृंगाचे उंचावणे, मार्कंडेयाचे मनन,
सप्तदेवाची तेजोमयता, सप्त मानवाचे कर्तृत्व,

प्रशांततेत मधुर वीणेचा सर्वंकष रस,
सप्त पाताळी आगळे वेगळे आश्चर्य,

जीवनात मरण्यात वाढणारी मोठी समृद्धी, –
इच्छिलेले सर्व विधात्याचा महान संकल्प,

नेई पूर्तीस त्याचीच कार्यसिध्दीची प्रेरणा;
निश्चित, हाच तर सौंदर्याचा अद्भुत उत्सव.

१३ मे २०२५

## २५ः ह्या प्रेमभरणीत एकच ध्यास

आश्चर्य की! घडत आहे हे युगायुगानंतर,
उत्कट अलौकिक पळ, एक अतुलनीय क्षण;

हा असा, स्थिर, शांत, भरीव, निश्चल, उभा,
पाहत आहे गतिमान शाश्वत अद्भुतते ने;

भाग्यशाली काळाच्या अधिष्ठात्याने निवडलेला,
तो योग दिव्य देहाची योजना करण्यासाठी;

येति जेंव्हा दाहीही दिशा मंत्रमुग्ध बिंदूत
सहजतेने आनंदाची घट्ट धरलेली सुसंधी;

प्रभावी गर्जना उचंबळून उल्हासी खोलातूनी
एका आवेशी अविश्वसनीय महासागराची;

ओतले आहे किनाऱ्याहीन आश्चर्यात,
माधुर्यामधे झा ले ले एकमेव माधुर्यच,

एक रूप होऊन अथांग ते परिपूर्ण जीवन
सोनेरी मधात सोनेरी मध, दिवसात दिवस;

प्रियेचे सुंदर रेखीव आंतरिक आकर्षण
करीत आहे हिरव्यागर्द सृष्टीला उल्हसित;

आणिले आहे प्रेम-प्रीतीने निदर्शनास, बाहेरही,
दृष्टीला टाकले दाखवून, केले आहे प्रसन्न;

आणि खुलवूनि सौंदर्याच्या आनंदी जादू ने
केले तिने मोहित प्रियकराच्या नश्वर आत्म्याला;

आकाशभर थोरला गोडवा जिंकूनि प्रियतमेने,
पुरातन देहव्यथा त्याच्या टाकल्या काढून;

कालातीत, कठोर, श्रेष्ठतेच्या आड येणारे
आत्मा आणि जड पदार्थातील द्वैत के ले नष्ट;

विचारांचे अजागळ गाठोडे दिले धुडकावून,
झाला लुप्त भौतिक-आत्मिकेतील आभास;

करीत आहे भूतळी नृत्य उल्हसित थोरवी,
सौंदर्य-आकर्षण यांची, भरगच्च आनंद;

पण होता एकच मोठा ध्यास ह्या प्रेमभरणीत,
उद्यानाच्या प्रसन्न हृदयात मंजुळ हास्याचा गोडवा;

ती पछाडणी, असण्या ची एक रूपांतरीत तनु,
दिव्य क्रियाशील पार्थिवता, हो, मृत्युलोकीही;

असेल असे वाद्य जशी काही अभिनव वीणा,
अनं ताचे संगीत प्रदान करणारी, अनं ताची;

आत्म्याच्या बहुविध महानतेत प्रकटणारी,
तेजस्विनी, देई दिव्यत्व ह्या जडरूपासही;

हे तर सोनेरी-नारंगी ज्वलंत पात्र अग्नीचे,
हो, चढत आहेत ज्वाला व्यापूनि सारे गगन;

केले होते जे इच्छित घडत आहे ते आता ,
चौतन्यमय कुंड, त्याची तनु, श्वास घेणा री;

उमलली आहेत बागेत सर्वत्र नवनवीन फुले,
अंगणातही हा इंद्रधनुष्य सहस्त्र रंगांचा;

दरवळे सौरभ विख्यात मनीस्वप्नी, सदा,
आनंदी, आणि करीत आहेत गोळा भ्रमर;

आल्हादिक मधू, आविष्कार मधुराईचाच,
छान घागरीच्या घागरी काठोकाठ भरलेल्या;

स्वीकारुनी देहा चा चौतन्यशील प्रादुर्भाव
जीवनाचे वैभव उजळी पुष्कराज अग्नी;

येईल घडवूनी मृत्यूहीन अमृतमय काया
प्रत्यक्षात पृथ्वीवर होईल ज्ञान पुरुष तो.

१४ मे २०२५

## २६ः संसाराची ओढ

संसाराची ओढ जानता त्याचे सत्यरूप,
गाण्यातुनी येई नाद प्रशांत स्तब्धतेचा;

उद्यानातील हर्ष, रंगीत फुलाफळांचे स्मित,
दवबिंदूंचे आत्मकथन – हा सकाळचा गोडवा;

दुरुनी येती श्रीमंत भल्या प्रसन्न अंबारीतून,
झगझगीत रेशमी पोशाख आर्यभूषणीं;

पावलोपावली प्रत्यय मोठे घडण्याचा,
क्षणोक्षणी, सारखा होई मग चमत्कार;

हा तर संसार योजिला विचारवंतानीच
पसरण्या बहुआयामी किमती रूपांतरण;

ह्यास म्हणे प्राणाहुती जीवनकुंडातल्या
सत्वसंपन्न ज्वालांनी झालेली पवित्रता.

१ जून २०२५

## २७: तिचा अविरत ध्यास

अहो हि तर आश्चर्याची गहन योजना,
ह्या शून्याच्या वाळवंटात निवडुंग;

दाखवीत असे त्याचे विचारवैभव
समुद्राच्या उल्हासात प्रवाळच;

वडाच्या झाडावर मारी उड्या माकडे
लुटण्या आनंद स्तवनीय स्रष्ट्याचा;

काळी मुंगी साखरेचा छोटासा कण
शोधत शोधत धावे अनवाणी सर्वत्र;

ओळखला मी तिचा अविरत ध्यास
आंतरिक जाता मिळे सार्वभौमिकत्व.

५ जून २०२५

## २८: अग्निज्वाला घडवी तीव्र जीवन

उचंबळून येता आंतरिक भावना
घडू दे तीव्र जीवन अग्निज्वालांनी;

कल्पनेचे थवे मारे उंच उंच भरारी,
स्फूर्ती पाठवी शब्द आविष्काराचे;

सुवर्णशांतीचा महिमा असा की
येई दूरगामी महाप्र्प्रज्ञेची ऋद्धी;

आमंत्रण आहे समृद्धीच्या मेजवानीचे,
सौराग्नीत शिजवलेली मूलपक्वान्ने;

